# FAQ

## (पिक विज्ञान)

**प्रश्न 1ः—कपाशीमध्ये तण नियंत्रण कसे करावे ?**

उत्तर 1ः—कपाशीतील तण नियंत्रणासाठी लागवडी नंतर 20 आणि 40 दिवसानी दोन खुरपण्या करून तिन कुळवाच्या पाळया 30, 60 आणि 90 दिवसांनी दयाव्यात. उभ्या पिकात तृणवर्गीय तणे असल्यास क्विझॅलोफॉप इथाईल (टरगा सुपर 5% इ.सी.) या तणनाशकाची प्रति हेक्टरी 1 लिटर मात्रा 500 लिटर पाण्यातुन फवारणी करावी. फवारणी करतांना फवारणी द्रावणात प्रसारक द्रव्य 10 मि. ली/10 लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. फवारणीनंतर 10 दिवस डवरणी करू नये. किंवा पायरीथायोबॅक सोडीयम (हिटविड) या तणनाशकाची 10 मि.ली/10 लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.

**प्रश्न 2ः—बी.टी. कपाशीतील लाल्याच्या व्यवस्थापणासाठी उपाय सांगा ?**

उत्तर 2ः—पिक फुलोऱ्यात असतांना 2% यूरिया किंवा 2% डिएपीच्या 8 दिवसाच्या अंतराने एकामागे एक असे प्रत्येकी 2 फवारे मारावेत. पिकावर लाल्या दिसुन आल्यास 1 टक्के मॅगनेशियम सल्फेटची फवारणी करावी.

**प्रश्न 3ः—सोयाबीनमधील तण नियंत्रानासाठी रासायनिक तननाशके कुठली वापरावी ?**

उत्तर 3ः—सोयाबीन मध्ये पहिली डवरणी पेरणीपासुन 15 ते 20 दिवसांनी व दुसरी 30 ते 35 दिवसाच्या दरम्यान करावी आणि आवश्यकतेनुसार 1 ते 2 वेळा खुरपणी करावी. किंवा पिकाची उगवण झाल्यावर 10 दिवसांनी इमॅजिथाप (परसूट 10 एस. एल.) या तणनाशकाची 0.75 ते 1.0 लिटर व्यापरी मात्रा 2 ½ एकर शेतामध्ये फवारणी करावी.

**प्रश्न 4ः—बी.टी. कपाशीकरिता संकरित वाणाची नावे सुचवा ?**

उत्तर 4ः—भारत सरकारने सद्या स्थितीत 1373 संकरित बी.टी. कपाशीच्या वाणाना मान्यता दिली असुन विदर्भात मल्लिका बी.जी II, राशी—2, बी.जी II,जय, अजित 155, डॉ ब्रेंट, जादू, बन्नी 145, कनक पारस ब्रम्हा, महिको 5173, मारोती सुपर हया वाणाची लागवड फायदेकारक दिसुन आली.